

स्थापना : १९०१

श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था

२९६८, 'सी', दसरा चौक, कोल्हापूर-४१६ ००२.
☎ २६४२९२१, २६४०९२२, फॅक्स : (०२३१) २६४१९५४
Email : shahuchha@hotmail.com

श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे
स्थापना : १९७१

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय

२९६८, 'सी', दसरा चौक, कोल्हापूर-४१६ ००२. ☎ (०२३१) २६४४२०४
फॅक्स : २६४१९५४ • Email : sscm34.cl.@unishivaji.ac.in
Website : www.shahajicollege.ac.in
Re-accredited by NAAC with Grade 'B' (C.G.P.A. 2.61)
Affiliated to : Shivaji University, Kolhapur-416 004. Maharashtra



Office Blog Address : : sscm34admin.blogspot.com

चेअरमन
श्री. मानसिंग विजयराव बोंद्रे

ऑन. सेक्रेटरी
श्री. विजयराव श्रीपतराव बोंद्रे

५० सुवर्ण महोत्सवी वर्ष

• प्राचार्य :
डॉ. आर. के. शानेदिवाण, एम.ए., पीएच.डी. नेट (मराठी)
Office : (0231) 2644204, Mob. 9960995853

संदर्भ क्र. : एस् एस् सी एम्/

दिनांक :


# शाहू क्लब (Shahu Club)

## शाहू क्लबची संकल्पना:

शाहू क्लब हा उपक्रम महाविद्यालयाच्या स्थापनेपासून सुरू आहे. शाहू क्लबला खऱ्या अर्थाने प्राध्यापक प्रबोधनी म्हणता येईल. कारण शाहू क्लबचा मूळ उद्देश महाविद्यालयातील शिक्षकांच्यासाठी प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन करणे हा आहे. केवळ प्रबोधनात्मक व्याख्यानांचे अथवा उपक्रमांचे आयोजन करणे हा उद्देश नसून महाविद्यालयातील प्राध्यापकानी आपल्या आवडीच्या विषयावर अथवा त्यांनी स्वत: केलेले संशोधन आपल्या सहकाऱ्यांच्या समोर व्यक्त करावे, मांडावे हा दुहेरी उद्देश आहे. शाहू क्लबच्या माध्यमातून महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या व्यतिरिक्त विविध क्षेत्रातील आणि विषयातील तज्ञ मान्यवर व्यक्तींची मार्गदर्शनपर व्याख्यानेही शाहू क्लबच्या माध्यमातून आयोजित केली जातात.

## उद्देश:

१. शैक्षणिक क्षेत्रातील बदलांच्या बरोबरच सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय समकालीन विषयावर चर्चा घडवून आणणे.
२. विविध विषयावरील उद्बोधनपर व्याख्यानांचे आयोजन करणे.
३. महाविद्यालयातील शिक्षकांना त्यांचे संशोधन आणि विचार मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे.

## आयोजित उपक्रम अथवा व्याख्याने:

शाहू क्लबच्या माध्यमातून गेल्या पाच वर्षात खालील विषयावर व्याख्याने आयोजित केली गेली. यामध्ये प्र. प्राचार्य डॉ. एच. एस. वनमोरे, प्रा. सुधाकर मानकर, डॉ. बी. एस. माळी, डॉ. मकरंद ऐतवडे, प्राचार्य डॉ. वि. एस. पोवर, श्रीमती सीमा पाटील, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, डॉ. भालबा विभूते, प्रा.

गौतम जाधव, डॉ. सौ. एस. एस. पाटील, डॉ. सौ. एन. डी. काशिद-पाटील, डॉ. आर. डी. मांडनीकर इत्यादीची विविध विषयावर व्याख्याने आयोजन करण्यात आली आहेत.

**शाहू क्लबची उपलब्धी:**

शाहू क्लब अर्थात प्राध्यापक प्रबोधनीच्या माध्यमातून आयोजित केलेले उपक्रम अथवा व्याख्याने शैक्षणिक क्षेत्रातील बदलांच्या बरोबरच  सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय आदि समकालीन विषयावर चर्चा घडवून आणण्याचे महत्वाचे व्यासपीठ ठरलेले आहे. महाविद्यालयातील विविध विषयांच्या प्राध्यापकांच्या बरोबरच विविध क्षेत्रातील मान्यवर तज्ञ व्यक्तींनी या व्यासपीठाच्या माध्यमातून आपले विचार मंथन केलेले आहे यांचा निश्चितच महाविद्यालयातील प्राध्यापकांना फायदा झालेला आहे. अनेक शिक्षकांनी त्यांच्या आवडीच्या विषयावर अथवा त्यांनी केलेल्या संशोधनावर या व्यासपीठाच्या माध्यमातून आपले विचार आणि संशोधन मांडलेले आहे. शाहू क्लबच्या उपक्रमांना शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्तम प्रतिसाद मिळत आहे.